नाव :-विशाल संतोष टापरे
वर्ग :- MSW द्वितीय वर्ष
रोल नं :- 55
विषय :- पर्यावरण संवर्धन व जनहिताच्या रक्षणातुन ग्रामीण विकास,
(मु ,पो -खळगाव ,ता - कर्जत , जिल्हा-अहमदनगर)

प्रस्तावना :-

कोरोना व्हायरस या आजाराचा संपूर्ण जगामध्ये अतिशय भयानक परिणाम झालेला दिसून येतो इतर देशांबरोबरच भारत देशात देखील कोरोना व्हायरस या आजाराचे अनेक दुष्परिणाम दिसून आले निश्चित असा उपाय नसल्याने व लस उपलब्ध नसल्याने अनेक लोकांना ऑक्सीजन मुळे स्वतःचा जीव गमवावा लागला. कोरोना काळामध्ये मोठ्याप्रमाणात ऑक्सिजनची कमतरता भासली तशीच परिस्थिती विद्यार्थी समाज कार्यकर्त्याला रवळगाव या गावामध्ये दिसली. कारण गावांमध्ये ऑक्सिजन बेड अभावी दोन कोरोना रुग्णांचे मृत्यू झाल्याचे आढळून आले.या सगळ्या बाबींचा विचार करून समाजकार्य प्रशिक्षणार्थी ने रवळगाव या गावामध्ये

लोकसहभागातून आणि समुदाय सहभागातून केलेले उपाय

आणि प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला.

# नागर फौंडेशन, रवळगाव

- ग्रामीण विकास
महिला सक्षमीकरण
- बालविकास.
आधुनिक शेती
- पर्यावरण



# हस्तक्षेप



क्षेत्रकार्य करत असताना प्रशिक्षणार्थी ने सकारात्मक हस्तक्षेप करून  समूदाय विकासाच्या हेतूने उपक्रम राबविले

- शिक्षण
- आरोग्य
- पर्यावरण

# शिक्षण

- समाजकार्य प्रशिक्षणार्थी ने नागर फाऊंडेशन या संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात काम करत असताना  पूढील उपक्रम राबविले
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर आयोजित केले
- यामध्ये 50 विद्यार्थी सहभागी झाले.
- करिअर गायडन्स मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले.



# आरोग्य

कोरोना विषाणू महामारी चा प्रादुर्भाव पूर्ण जगावर झाला असून त्याचा प्रभाव आरोग्य क्षेत्रावर पण झाला आहे

- रवळगाव या गावातील 0 ते 18 या वयातील लहान मुलांच्या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.
- रक्त तपासणी
- हाडांची तपासणी
- कॅल्शियमची तपासणी



sangharshnama.in/selecte

## रक्तदान आणि झाडें .. रक्तदान करूया, मानव धर्म वाढवूया - नागर फौंडेशन

संघर्षनामा न्यूज

कोणत्याही गोष्टीची किंवा घटकाची किंमत स्वत:वर वेळ आल्यावर आपल्याला समजत असते.वेळ ही अशी गोस्ट आहे ती व्यक्तीला किंवा समाजाला सर्व गोष्टींची किंमत आणि महत्व दाखवून देते. कोरोना या रोगाने समस्थ मानव जातीला निसर्ग आणि माणुसकी या गोष्टींचे महत्व पटवून दिले.

कोरोना काळामध्ये ऑक्सिजन आणि प्लास्मा (रक्त ) या दोन गोष्टींच्या आभावामुळे अनेक व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेली.ज्यावेळी आपल्या घरातील, नात्यातील व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या तेव्हा समाज जागा झाला. या दोन गोष्टी अशा आहेत कि त्या मानव तयार करू शकत नाही. या गोष्टी फक्त निसर्गमध्ये निर्माण होतात.

निसर्गमध्ये झाडांचे महत्व मोठे आहे, झाडें ऑक्सिजन

# पर्यावरण

- पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, असमतोल दरवर्षी वाढत चाललेली जंगलतोड
- लोकसहभागातून वृक्षारोपण
- 27 जून 2021 रोजी महा वृक्षारोपण सोहळा आयोजित केला.
- यामध्ये 1500 झाडे लावली
- 10 जुलै 2021 रोजी या उपक्रमा अंतर्गत 1100 झाडे लावली.
- वृक्षारोपण कार्यक्रमात श्रमदान करण्यासाठी 200 हुन अधिक लोक सहभागी झाले.
- रवळगाव, मंदिर परिसर,स्मशानभूमी परिसर, सारोळा कासार इ.ठिकाणी वृक्ष लागवड केली


मास्क वापरा, सुरक्षित रहा!

दैनिक जय महाभारत

दिलीप अनारसे तालुका प्रतिनिधी -९६६५१६९३५२

संपादक - विजयकुमार वाव्हळ

## रवळगांवमध्ये नागर फौंडेशन च्या वतिने भव्य वृक्षारोपन सोहळा

कर्जत/दिलीप अनारसे (दै. महाभारत)

रवळगांवमध्ये नागर फौंडेशन च्या वतिने भव्य वृक्षारोपन कर्जत तालुक्यातील रवळगाव येथे भव्य वृक्षारोपण आणि महाश्रमदान सोहळा अत्यंत उत्साहात चिंतामणी परिसर मंदिर या ठिकाणी पार पडला. या कार्यक्रमाला श्रमदान करण्यासाठी कर्जत वरून माझी वसुंधरा स्वच्छ सर्वेक्षण टीम तसेच सर्व सामाजिक संघटना कर्जत, त्याचप्रमाणे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री स्वप्नील देशमुख सर (इंडस्ट्री सेफ्टी डीपुटी डायरेक्टर), विश्वास बीज सपोर्टरचे श्री जगदीश शिंदे सर, तसेच च-ठऋढशरा, आणि विश्वास बिज ग्रुप सारोळाचे वृक्षमित्र, रजनी गावाचे वृक्षमित्र, महिला बचत गट कर्मचारी टीम श्रीकृष्ण अहमदनगर. तसेच संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यातील सर्व वृक्षप्रेमीनी श्रमदान केले. तसेच उपस्थित पत्रकार बंधुनीही श्रमदान केले. नूतन माध्यमिक विद्यालयाचे प्रार्चाय. प्रा.खेडकर सर विशेषता म्हणजे या कार्यक्रमासाठी गावातील तरुण वर्ग तसेच रवळगाव समस्त ग्रामस्त या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन नागर फाऊंडेशन रवळगांव ने केले होते. अत्यंत नियोजनबध्द सर्व कोव्हिडचे नियम पळून हा कार्यक्रम आयोजित करून नागर फाऊंडेशनने संपूर्ण राज्याला एक नवा आदर्श घालून दिला आहे. निसर्गाचे आपण काहीतरी देणे आहोत, निसर्ग संवर्धन आज किती गरजेचे आहे,येणाऱ्या काळात निसर्ग संवर्धन करण्यासाठी खंद्याला खंदा देऊन काम करण्यची अत्यंत गरज आहे. नागर फाऊंडेशन चे अध्यक्ष . रवींद्र गोरे यांनी २०१९ पासून लोकसहभागातून २८०० तसेच बिहार पॅटर्न च्या माध्यमातून १२०० असे आज पर्यंत जवळपास ४००० स्वदेशी वृक्षांची लागवड केली आणि उत्कृष्ठ पद्धतीने जागवली आहेत. आज या कार्यक्रमच्या माध्यमातून आजून चिंतामणी मंदिर परिसरात जवळपास १००० वृक्ष लागवड केली.आलेल्या सर्वांचे नागर फाउंडेशनचे अध्यक्ष व सदस्य यांनी आभार मानले.

# हेतू

- जंगलतोड
- वृक्षतोड
- पर्यावरणाचा वाढत चाललेला ऱ्हास
- जंगलांना लागणारी आग



# अडचणी आणि आव्हाने

- Covid-19 चे नियम
- लोकसहभाग
- वेळेचे नियोजन
- संस्थेशी स्वतः ला जुळवून घेणे

# THANK YOU !!!